जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 DEC 2023
लोकमत

# धन्यकुमार गुंडे यांची विद्यापीठास सदिच्छा भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ॲड. धन्यकुमार गुंडे यांनी शिवाजी विद्यापीठास सपत्नीक सदिच्छा भेट दिली.

कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी शाल, स्मृतिचिन्ह व ग्रंथ भेट देऊन स्वागत केले. ॲड. गुंडे यांनी शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असल्याचा अतिशय अभिमान असल्याचे नमूद केले. विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या कार्याविषयीही त्यांनी कौतुकोद्‌गार काढले. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. विजय ककडे, अनिल पाटील, डी.ए. पाटील, डॉ. चंद्रकांत चौगुले आदी उपस्थित होते.

26 DEC 2023


सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभ्यासिकेतून जपल्या जाणार स्मृती

## ॲड. पणदूरकर दाम्पत्याचे दातृत्व ; शिवाजी विद्यापीठाला ३५ लाखांची देणगी

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे धनादेश सुपूर्द करताना हेमकिरण पणदूरकर व ॲड. राम पणदूरकर. यावेळी शेजारी वरदराज बापट, ॲड. अमोल रणसिंग, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. विलास शिंदे आदी.

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाचे निवृत्त भूगोल अधिविभागप्रमुख व ॲड. राम पणदूरकर आणि त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी पेन्शन बचतीतून साठविलेले ३५ लाख रुपये आपले एकमेव अपत्य दिवंगत डॉ. (ॲड.) रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केली. या देणगीतून विद्यापीठातील 'कमवा व शिका' विद्यार्थिनी वसतिगृह परिसरात विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका बांधण्यात येणार आहे. नवीन वर्षात ही अभ्यासिका साकार होईल.

ॲड. रूपाली पणदूरकर यांनी सर्व शिक्षण विद्यापीठातून पूर्ण केले. वयाच्या अवघ्या ३० व्या वर्षी त्यांनी 'महाराष्ट्रातील बालगुन्हेगारीचा सामाजिक व कायदेविषयक अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध सादर करून कायदे विषयात पीएच.डी. मिळविली होती. सतारवादनाचे शास्त्रशुद्ध शिक्षण गांधर्व महाविद्यालयातून घेतले. सार्वजनिक व्यासपीठांवरून सतारवादनाचे कार्यक्रम केले होते. त्यांनी २००१ पासून १४ वर्षे कोल्हापूर दिवाणी न्यायालयात वकिली केली.

> डॉ. राम पणदूरकर यांनी दिवंगत कन्या ॲड. रूपाली यांच्या स्मरणार्थ विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका निर्मितीसाठी ३५ लाख रुपयांची देणगी दिली, ही गहिवरून टाकणारी बाब आहे. मुलीच्या माघारी समाजातील लेकीबाळींना तिच्या स्थानी मानून त्यांच्यासाठी काहीतरी भरीव उभे करण्याचे दातृत्व पणदूरकर दाम्पत्याने दाखविले आहे.
>
> **-डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू

दरम्यान, ॲड. रूपाली यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला पणदूरकर दाम्पत्याने कुलगुरू डॉ. शिर्के यांची त्यांच्या दालनात भेट घेऊन देणगीचा धनादेश सुपूर्द केला.

जनसंपर्क कक्ष
26 DEC 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ-भारतीय भू-चुंबकत्व संस्थेच्या सामंजस्य कराराचे नूतनीकरण

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील भौतिक शास्त्र अधिविभाग व भारतीय भू-चुंबकत्व संस्था, मुंबई यांच्यामध्ये सामंजस्य कराराचे नूतनीकरण करण्यात आले. भारतीय भू-चुंबकत्व संस्था (आयआयजी) भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागांतर्गत कार्यरत स्वायत्त संशोधन संस्था आहे. आयआयजी, शिवाजी विद्यापीठ यांच्यातील पहिला वैज्ञानिक सामंजस्य करार मे १९९१ रोजी झाला होता. दर पाच वर्षांनी त्याचे नूतनीकरण केले जाते.

सामंजस्य करारामुळे आयआयजी, विद्यापीठ आणि त्यांच्या संलग्न महाविद्यालयांमधील प्राध्यापक, विद्यार्थी यांच्यात अनेक विषयांवर संवाद साधण्यास मदत होईल. कुलगुरू डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू पी. एस. पाटील व कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनामुळे हे शक्य झाले असल्याचे प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी सांगितले. यावेळी प्रा. ए.पी.डिमरी, प्रा. एस. गुरुबरन, प्रा. सत्यवीर सिंग, डॉ. गोपी सीमाला, कुलसचिव आशुतोष शुक्ला, प्रा. आर. जी. सोनकवडे आणि डॉ. आर. एस. व्हटकर आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ भौतिकशास्त्र अधिविभाग व भारतीय भू-चुंबकत्व संस्था सामंजस्य करार नूतनीकरणप्रसंगी प्रा. आर. जी. सोनकवडे, आशुतोष शर्मा, डॉ. आर. एस. व्हटकर, प्रा. ए. पी. डिमरी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 DEC 2023
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ-आयआयजी सामंजस्य कराराचे नूतनीकरण



**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील भौतिक शास्त्र अधिविभाग आणि भारतीय भूचुंबकत्व संस्था, मुंबई यांच्यामधील सामंजस्य कराराचे नूतनीकरण करण्यात आले. भारतीय भूचुंबकत्व संस्था (आयआयजी) ही भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागांतर्गत कार्यरत असलेली स्वायत्त संशोधन संस्था आहे. हा सामंजस्य करार मे १९९१मध्ये करण्यात आला होता. दर पाच वर्षांनी त्याचे नूतनीकरण केले जाते. सामंजस्य कराराचा उद्देश परस्पर संमतीने सुविधांची देवाणघेवाण करणे, विद्यार्थ्यांना अंतराळ आणि पृथ्वी विज्ञान क्षेत्रात संशोधनासाठी प्रशिक्षण देवून सक्षम करणे आणि संशोधनासाठी प्रवृत्त करणे, तसेच या क्षेत्रात होणाऱ्या संशोधनाची आणि कौशल्याची देवाणघेवाण करणे हा आहे. कुलगुरू डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू पी. एस. पाटील आणि कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्या प्रोत्साहनामुळे हे शक्य आहे, असे प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी सांगितले. या प्रसंगी आयआयजीकडून संचालक प्रा. ए. पी. डिमरी, प्रा. एस. गुरुबरन, एपीसीचे अध्यक्ष प्रा. सत्यवीर सिंग, डॉ. गोपी सीमाला, कुलसचिव आशुतोष शुक्ला, डॉ. भारती काकड तर शिवाजी विद्यापीठाकडून प्रा. आर. जी. सोनकवडे आणि डॉ. आर. एस. व्हटकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 DEC 2023
लोकमत

# विद्यापीठ, भारतीय भूचुंबकत्व संस्थेमध्ये कराराचे नूतनीकरण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभाग आणि भारतीय भूचुंबकत्व संस्था यांच्यामध्ये सामंजस्य कराराचे नूतनीकरण करण्यात आले. भारतीय भूचुंबकत्व संस्था ही भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागांतर्गत कार्यरत असलेली स्वायत्त संशोधन संस्था असून, भूचुंबकत्व, भूभौतिकी, वायुमंडलीय भौतिकशास्त्र, अवकाश भौतिकशास्त्र, तसेच प्लाझ्मा भौतिकशास्त्रातील मूलभूत आणि उपयोजित गोष्टींमध्ये संशोधन करते. शिवाजी विद्यापीठ आणि भूचुंबकत्व संस्था यांच्यातील पहिला वैज्ञानिक सामंजस्य करार १९९१ रोजी केला होता. दर पाच वर्षांनी त्याचे नूतनीकरण केले जाते. ते आजपर्यंत चालू आहे.

या दोन्ही संस्थांच्या ठिकाणी पृथ्वी विज्ञान आणि अवकाश संशोधन होते. भूचुंबकत्व संस्थेकडून संचालक प्रा. ए. पी. डिमरी, प्रा. एस. गुरुबरन, एपीसीचे अध्यक्ष प्रा. सत्यवीर सिंग, डॉ. गोपी सीमाला, कुलसचिव आशुतोष शुक्ला, डॉ. भारती काकड, विद्यापीठाकडून प्रा. आर. जी. सोनकवडे, डॉ. आर. एस. व्हटकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

26 DEC 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ पीएच.डी. प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील पीएच.डी. प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेशप्रक्रियेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. अर्ज करण्याची अंतिम तारीख १० जानेवारी आहे. विद्यार्थ्यांनी www. unishivaji. ac. in अंतर्गत ph. D. Admission २०२३-२४ या लिंकवर भेट द्यावी. प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक तसेच हॉल तिकीट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यईल, अशी माहिती कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे यांनी दिली.